प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारीबो विंग, पहिला माळा,
वनभवन००१ ४४० नागपूर, सिव्हील लाईन्स, रामगिरी रोड,
दुरध्वनी क्र२५५६९१६ ०७१२, ईमेल : apccfnodal@mahaforest.gov.in

ई-मेलव्दारे/स्पिडपोस्टव्दारे

क्र.कक्ष-१७/नोडल/अमरावती/आयडी-१२६९५/ ३७९ /२०२३-२४
नागपूर ४४० ००१, दिनांक ०९ /०५/२०२३

प्रति.) अमरावती यांचे कार्यालय मुख्य वनसंरक्षक (प्रा.),
...... अमरावती 2478
10 MAY 20..
.......... प्राशासकिय अधिकारी

विषय :- वनजमीन- अमरावती
अमरावती-नांदगाव-मोर्शी-वरूड-पांढूर्णा या राष्ट्रीय महामार्गाच्या कामासाठी अमरावती जिल्ह्यातील १४.७९७ हे. वनजमीन वळती करणाबाबत.

संदर्भ :- महराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, पत्र क्र.एफएलडी-३१२३/प्र.क्र.१४०/ फ-१०, दि.०८/०५/२०२३.

विषयांकीत प्रकरणी संदर्भीय पत्रान्वये राज्य शासनाकडून उपस्थित करण्यात आलेल्या मुद्दा क्र.१ च्या अनुषंगाने पर्यायी वनीकरणासाठी नेमकी कोणती व किती अवनत वनजमीन प्रस्तावित करण्यात येत आहे? याबाबतची माहिती आवश्यक दस्तऐवजांसह ज्यामध्ये तीन प्रतीत उपवनसंरक्षक यांचे CA area suitability certificate, नकाशा व KML file CD राज्य शासनास सादर करणेसाठी या कार्यालयास सादर करावी, हि विनंती.

सहपत्र:- वरीलप्रमाणे

(डॉ.कुमारस्वामी एस.आर.)
उपवनसंरक्षक, वन (संवर्धन)
नागपूर

प्रतिलिपी:- उपवनसंरक्षक, अमरावती वनविभाग, अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस समादराने सस्नेह अग्रेषित.

---

**पत्र / ई-मेलव्दारे**

**क्रमांक :** कक्ष-4/ जमीन/FCAप्रस्ताव/प्र.क्र./ / 2023-24
**अमरावती -2,** दिनांक : / / 2023

**प्रतिलीपी :** उपवनसंरक्षक (प्रादेशिक), अमरावती यांना माहितीस व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित. आपणास कळविण्यात येंते की, प्रकरणी शासनाकडील दिनांक 08/05/2023 रोजीचे पत्रातील नमूद 1 व 02 मुद्यांचे अनुषंगाने माहिती आवश्यक त्या दस्ताऐवजासह चार प्रतीत CA area suitability certificate, नकाशा व KML File CD सह तात्काळ या कार्यालयास सादर करावी.

**(जी. कें. अनारसे)**
**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) अमरावती**

महाराष्ट्र शासन

E-mail: deskf10.rfd-mh@gov.in

क्र.एफएलडी-३१२३/प्र.क्र.१४०/फ-१०
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- ०८ मे, २०२३

प्रति,

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर

विषय:- वनजमिन-अमरावती
अमरावती-नांदगाव- मोर्शी- वरूड- पांढूर्णा या राष्ट्रीय महामार्गाच्या कामासाठी अमरावती जिल्ह्यातील १४.९७९ हे. वनजमीन वळती करण्याबाबत...

संदर्भ:- केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. कक्ष-१७/नोडल/अमरावती/D १२६९५/२१७/२०२३-२४, दि.२६.०४.२०२३.

विषयांकित प्रकरणी उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने खालील मुद्यांची माहिती शासनास सादर करावी:-

(१) प्रस्तुत प्रकरणी १४.९७९ हे. वनजमिनीचे वळतीकरण प्रस्तावित आहे. त्यामुळे पर्यायी वनीकरणासाठी वळती होणा-या वनजमिनीच्या दुप्पट अवनत वनक्षेत्र पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित करणे आवश्यक आहे. मात्र, केंद्रस्थ अधिकारी यांच्या पत्रात पृष्ठ क्र. ३ येथे मौ.गोलविहिर, ता. वरूड, जि. अमरावती येथील वनजमीन पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित करीत असल्याचे नमूद आहे. त्यामध्ये नेमकी किती जमीन पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे याचा उल्लेख नाही. तर सदर पत्रातील पृष्ठ क्र. ७ येथे मौ. पांढरेवाडी, ता. दौंड, जि. पुणे येथील ग. नं. ५६७ मधील ९३.९३५ हे. अवनत वनजमीन प्रस्तावित करण्यात येत असल्याचे नमूद आहे.

त्यामुळे या प्रकरणी पर्यायी वनीकरणासाठी नेमकी कोणती व किती अवनत वनजमीन प्रस्तावित करण्यात येत आहे याचा बोध होत नाही. याबाबत आपल्या स्वयस्पष्ट अभिप्रायासह माहिती सादर सादर करावी.

(२) प्रस्तावित वनजमीन वन्यजीव / व्याघ्र भ्रमणमार्गाचा भाग आहे किंवा कसे? प्रस्तुत प्रकरणी वन्यजीव मंजूरीची आवश्यकता आहे किंवा कसे याबाबत, याबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचे अभिप्राय घेऊन, माहिती सादर करावी.

(गणेश जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन